# लॉकडाऊन शिथिलीकरणानंतर एनएचएसआरसीएलद्वारा विविध कार्यांचा पुनः आरंभ

लॉकडाऊनचे निर्बंध हळूहळू मागे घेत असतानाच, एनएचएसआरसीएल आपली सर्व कार्यालये उघडण्यासाठी आणि बांधकाम, जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया, कन्सेंट कॅम्प्स आणि युटीलिटी शिफ्टिंगसारख्या अनेक साईटवरील कामांना सुरु करण्याची तयारी करत आहे. लॉकडाऊनचा कालावधी विभिन्न विभागांदरम्यान सर्व प्रयत्नांच्या समन्वयासाठी आणि आरआयटीएस, जॅपनीज इंटरनॅशनल कन्सल्टंट्ससारख्या विविध भागधारकांसह समन्वयात आणण्यासाठी वापरण्यात आला. याच वेळी आम्ही तीन सक्रीय टेंडर्ससाठी पहिल्यांदाच ऑनलाइन प्री-बिड बैठकीचे आयोजन केले. हे तंत्रज्ञानाच्या मदतीने पुढे जाण्याच्या दिशेत एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले. सर्व एनएचएसआरसीएल विभाग प्रमुख उपयुक्त पद्धती व्यक्त करण्यासाठी आणि त्यांनी हाती घेतलेल्या विविध कामांबद्दल एकमेकांना माहिती पुरविण्यासाठी नियमितपणे व्हिडियो कॉन्फरन्सिंगद्वारा एकमेकांशी भेटत होते. लॉकडाऊन कालावधीत सुद्धा आमच्यासाठी काम कधीही थांबले नाही.

आता, आपल्या कामाची नित्यक्रमे सामान्य होत आहेत, पण सोशल डिस्टन्सिंग आणि स्वच्छतेच्या मानकांमध्ये वृद्धी करण्यात आली असल्याने, आपली सर्व कार्यालये पूर्णपणे पुनः सक्रीय होत आहेत. अलीकडेच सुरत जिल्ह्यातील मुलड गावात कन्सेंट कॅम्प्सचे आयोजन करण्यात आले होते, युटीलिटी शिफ्टिंग काम सुरत आणि अहमदाबाद येथे पुन्हा सुरु करण्यात आले आणि साबरमती हब बांधकाम साईटवर बांधकाम पूर्ण वेग पकडत आहे. आम्हाला खात्री आहे की नजीकच्या भविष्यात आम्ही पूर्ण क्षमतेने कार्यरत होऊ.

येथे आमची कार्यालये आणि इतर साईटवरील कामाच्या काही प्रतिमा जोडल्या आहेत.




प्रतिमा 1: अहमदाबादमधील युटीलिटी शिफ्टिंग कार्य



प्रतिमा 2: एनएचएसआरसीएल पालघर कार्यालयात कार्यालयाचे सॅनिटेशनचे काम सुरु आहे




प्रतिमा 3: सर्व कार्यालयांच्या प्रवेशद्वाराकडे सॅनिटायझर ठेवण्यात आले आहे



प्रतिमा 4: एनएचएसआरसीएल कार्यालयात सोशल डिस्टन्सिंगचे पालन करण्यात येत आहे




प्रतिमा 5: एनएचएसआरसीएल कार्यालयातील थर्मल स्क्रीनिंग



प्रतिमा 6: सुरत जिल्ह्यातील मुलड गावात आयोजित कन्सेंट कॅम्प्स



प्रतिमा 7: वडोदरा जिल्ह्यातील एका कार्यालयातील थर्मल स्क्रीनिंग